
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष दहावे : अंक पंचवीस - सव्वीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१


''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार'' -
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित
पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव
● Accredited B++ with CGPA 2.76 by NAAC ● ISO मानांकन 9001:2015 ●
ता. तासगाव, जि. सांगली



# लोकसंस्कृतीची आविष्कार रुपे

Scanned with CamScanner




शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष दहावे : अंक पंचवीस व सव्वीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

# लोकसंस्कृतीची आविष्कार रुपे

**● संपादक ●**

**प्रा.(डॉ.)शिवकुमार सोनाळकर**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

**● अतिथी संपादक ●**

**डॉ.मिलिंद हुजरे**

प्राचार्य, पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि.सांगली

**डॉ.तातोबा बदामे** **डॉ.शहाजी पाटील**

**● कार्यकारी संपादक ●**

डॉ.नीला जोशी

**● संपादक मंडळ ●**

प्रा.(डॉ.)नंदकुमार मोरे डॉ.गोमटेश्वर पाटील डॉ. तातोबा बदमे डॉ.दिनेश वाघुंबरे

**● सल्लागार समिती ●**

डॉ. राजन गवस डॉ. प्रकाश कुंभार डॉ. डी. ए. देसाई डॉ. अनिल गवळी

**● प्रकाशक ●**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११

**मुद्रक**

देशमाने ऑफसेट,

औद्योगिक वसाहत, पलूस, (जि. सांगली) ४१६ ३१०, मो. ९९७०७००७५८

**मूल्य: ₹ ३००**

यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी देशमाने ऑफसेट, औद्योगिक

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| वऱ्हाडी लोकगीते: संस्कृती आणि लोकशिक्षण | डॉ. विजया प्रशांत पवार | ३५० |
| लोकसाहित्याचा मौखिक आविष्कार : जात्यावरील ओवी | डॉ. गजानन गोपाळराव हेरोळे | ३५४ |
| लोकजीवनातील म्हणींचे स्थान | वैशाली श्रीकांत गुंजेकर | ३५७ |
| लोकसाहित्याचा प्रयोगरूप आविष्कार | डॉ.सुभाष गणपती जाधव | ३६० |
| खरसुंडीचे लोकदैवत – श्री सिद्धनाथ | विजय शिंदे | ३६४ |
| लोकगीतातील भावविश्व | डॉ. विजय मे. जाधव | ३६८ |
| ज्ञानदेवांच्या गौळणीतील अध्यात्म विचार | डॉ. महेश नारायण गायकवाड | ३७१ |
| लीळाचरित्रातील लोककथा | डॉ. किरण प्रभाकर वाघमारे | ३७५ |
| लोकसंस्कृतीची अविष्कार रूपे – लोकनाट्य दशावतार | डॉ. प्रतिभा शंकर घाग–सोनी | ३७९ |
| लोकसंस्कृतीचे उपासक | दीपक हरिदास कांबळे | ३८१ |
| लोकसाहित्य, माध्यमांतर व चित्रपट यांचा संबंध | डॉ. अजित यल्लाप्पा कांबळे | ३८५ |
| प्रयोगरुप लोककला – 'जागरण ' | डॉ. नंदिनी गणपती काळे | ३८८ |
| मध्ययुगीन मराठीतील जैन परंपरेतील लोकगीते | डॉ. गोमटेश्वर पाटील | ३९२ |
| 'कळसूत्री बाहुली' : लोककलेचा आविष्कार | रेखा काशिनाथ पसाले | ३९६ |
| लोकदैवताचे सामाजिक व सांस्कृतिक अधिष्ठान | डॉ. भरत भिमराव जाधव | ३९९ |
| लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांचे भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील योगदान | डॉ.संग्राम गोपीनाथ थोरात | ४०२ |
| लोकसाहित्याचा प्रयोगरूप आविष्कार | स्मिता शिवराज पाटील | ४०६ |


Scanned with CamScanner

# लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांचे भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील योगदान

डॉ.संग्राम गोपीनाथ थोरात
किसन वीर महाविद्यालय,वाई

**प्रस्तावना**

सातारा जिल्ह्यातील तांबव्याचे देगांव येथे आजोळी लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांचा जन्म १५ ऑगस्ट, १९२३ रोजी झाला. त्यांचे मूळ गाव आनेवाडी ता. जावली पण वडील श्रीपतराव सातारा कँम्प येथे क्लबमध्ये उद्यानाचे मुकादम होते. (स्कूल बोर्ड येथे नाईक होते) त्यामुळे त्यांचे बालपण व शिक्षण साताऱ्यातच झाले. त्यांची आजी पंढरीच्या विठोबाची परमभक्त म्हणून तिने या बाळाचे नाव ठेवले 'पुंडलिक. तो लहानपणी इतरांच्या नकला करायचा म्हणून लोक त्याला 'गमताड्या पुंडलिक' म्हणू लागले. अशा प्रकारे लहानपणापासूनच सगळयांची दाद घेत घेत हा पुंडलिक पुढे एवढा मोठा झाला की त्याने महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण ते देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचेही मनोरंजन केले. पुढे मुंबईतील मूळजी जेठा मार्केटातील जे. एफ. अँड कंपनीच्या दुकानी कापडविक्री करणाऱ्याच्या हाताखाली त्यांनी काम केले. तिथेच १९४० साली ते गुरूवर्य केशवराव विचारे यांच्या सहवासात सत्यशोधक अभ्यास वर्गाचे विद्यार्थी झाले व यातूनच एका सत्यशोधकी शाहिराचा जन्म झाला.

म. फुल्यांचे सत्यशोधकीय विचार समाजाच्या तळागाळात पोहोचविणारे ते शाहीर होते तसेच काँग्रेस पक्षाचे ते निष्ठावंत प्रचारकही होते. लोकशाहीर पुंडलिक फरांदे हे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात सुमारे ५० वर्ष लेखन व गायन करणारे कलावंत शाहीर आहेत. १९४१ साली त्यांचे 'आपले कलापथक' रसिकांच्या सेवेसाठी सादर झाले. याच्या माध्यमातूनच त्यांच्या लेखनास सुरूवात झाली. सुमारे दहा पोवाडे, तीन लावण्या, दहा स्फूर्तिगीते, आठ लोकनाट्ये व सुमारे ५० ते ६० लोकगीते; त्यात भारूडे, भरली गीते, शेतकरी गीते, लग्नगीते असे शाहिरी वाययातील विविध प्रकार हाताळून त्यांनी मराठी लोकसाहित्याचे दालन समृध्द केले आहे.

महाराष्ट्रातील शाहिरांचे भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील योगदान

शाहिरी काव्याला राजाश्रय मिळवून देणाऱ्या पेशवाईचा इ. स. १८१८ मध्ये अस्त झाला. शाहिरांच्या वाणीतील जोशही लयाला गेला. इंग्रजी अमलाखालील प्रदेशातही शाहिरी काव्य निर्माण झाले परंतु त्यामध्ये मराठी बाणा नसल्याने ती कविता प्रभावी ठरू शकली नाही. १८५७ चे बंड क्रांतीच्या रूपाने झळाळून उठले व त्यामुळे मृतवत झालेल्या शाहिरी वाड्.मयालाही नवसंजीवनी मिळाली. स्वातंत्र्यवीरांच्या, क्रांतीकारकांच्या पराक्रमाचे सूत्र धरून पल्लवीत झालेल्या पोवाड्यांचा हा कालखंड स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तग धरून होता. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारताने लोकशाहीचे तंत्र स्वीकारले यातच मराठी भाषिकांचे स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. सार्वत्रिक


ISSN No. 2319-6025

Scanned with CamScanner

शिक्षणाचे तत्त्व महाराष्ट्र सरकारने स्वीकारून प्रादेशिक विद्यापीठांची निर्मिती केली. या शिक्षणप्रणालीमुळे शहरांप्रमाणेच ग्रामीण भागातील तरूणही सुशिक्षित झाला व आपल्या अभिव्यक्तीसाठी धडपडू लागला. या सुशिक्षित वर्गाचा साहित्यिक जिव्हाळा वाढल्याने त्यातून अभ्यासक संशोधकांचा वर्ग उदयाला आला. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मराठी भाषा व संस्कृती यांच्या वुध्दी - समृध्दीसाठी जी काही धोरणे अवलंबिली त्यामुळे लोकनाट्य, लोकसाहित्य व लोककला यांना प्रोत्साहन मिळाल्यामुळे पुन्हा एकदा शाहिरी साहित्यनिर्मितीला चांगले दिवस आले.

लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांचे भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील योगदान

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात शाहिरांचे योगदान आहे. ''शाहिरांनी १९४० ते १९४७ या काळात स्वातंत्र्याच्या चळवळीमधून शाहिरी कार्यक्रम व राष्ट्रीय कार्यकर्ता म्हणून जाणीवपूर्वक सहभाग घेतला.''१ हे त्यांचे राष्ट्रीय कार्यही प्रशंसनीय आहे. त्याबाबत साताऱ्याचे ज्येष्ठ पत्रकार जयवंत गुजर म्हणतात,''...पण स्वातंत्र्य चळवळीशी एकरूप होऊन देखील स्वातंत्र्यसैनिक म्हणून मानधन ज्यांच्या वाट्याला आले नाही असा हा जगावेगळा स्वातंत्र्यसैनिक माझा जीवाभावाचा मित्र आहे. आपली खानदानी गरीबी सांभाळून त्यांनी आपले अस्सल मराठमोळेपण, दणकटपणा व सातारी बाज कायम सांभाळला''२ अशा प्रकारे समाजसुधारक व राष्ट्रपुरूषांना आदर्श मानून त्यांचा पाईक म्हणून धडपडताना आलेल्या हालअपेष्टा त्यांनी जाणतेपणाने स्वीकारल्या. एवढेच नव्हे तर आपल्या सहकाऱ्यांनासुध्दा ती जाणीव दिली हे त्यांचे असामान्यत्व आहे. १९४२ सालच्या स्वातंत्र्य आंदोलनात मुंबईतील काँग्रेस कार्यकर्त्यांनी शाहिरांना प्रोत्साहन आणि सहकार्य दिले परिणामी शाहिरांचा डफ आणि वाणी मुंबईत वाड्या-वस्त्यांतून स्वातंत्र्याचे विचार पेरते झाली. मुंबई बाहेरही शाहिरांच्या कार्यक्रमांना वाढती मागणी येऊ लागली. शाहीर पुंडलिक फरांदे हे नाव महाराष्ट्रभर पोहोचू लागले. त्यांच्या कार्याची दखल घेताना मा. यशवंतराव चव्हाण (तत्कालीन भारताचे गृहमंत्री) म्हणतात, ''शाहीर फरांदे यांनी आपल्या प्रतिभेने व आवाजाने लोकरंजनाचे कार्य केले. परंतु त्याचबरोबर स्वातंत्र्य संग्रामाच्या आंदोलनाच्यावेळी लोकांना जागृत करून त्यांच्यातील देशाभिमान प्रज्वलित केला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर खेड्यातील जनतेला शिक्षित करण्याचे व विकासाचे महत्त्व समजावून सांगण्याचे कार्य शाहीर आपल्या कवनाने परिणामकारकपणे करू शकतो, हे शाहीर फरांदे यांनी दाखवून दिलेले आहे''.३ सदर गौरवोद्गार म्हणजे त्यांच्या कामाची ही सार्थ पावतीच आहे.

समाजात समता, बंधुता नांदावी तसेच सामान्य जनतेने आपली ताकद ओळखून समाजपरिवर्तनासाठी तयार व्हावे यासाठी शाहिरांनी जोशपूर्ण कार्यक्रम करून समाजाला जागृत केले. समाजात उठाव घडवून आणला. जनतेतील देशप्रेम जागृत केले. त्यामुळेच दिनकर पाटील शाहिरांना सेनानी संबोधतात आणि लिहितात, ''महात्माजींच्या आदेशानुसार हातात शस्त्र न धरता बंदुकीसमोर छाती उघडी करण्याची हिंमत आपल्याला कुणी दिली? शाहिरांनीच ना? म्हणजे शाहीर हेच स्वातंत्र्याचे पहिले सैनिक आहेत; हे आपल्याला मान्य केलेच पाहिजे. आणि अभिमानाची गोष्ट आहे लोकशाहीर पुंडलिक

फरांदे हे त्या सैनिकांचे सेनानी आहेत. स्वातंत्र्ययुध्दात त्यांनी केलेला उठाव लोकमान्य झाला आहे. लोकशाहीर ही लोकांनी अनाहूतपणे दिलेली पदवीच याची साक्ष आहे.''४ शाहिरांनी जनतेत राष्ट्रप्रेम उभा केले. मनोरंजन करीत करीत त्यांना लोकशिक्षण दिले व त्यांच्यात राष्ट्रप्रेम चेतविण्याचे कामही केले. त्यांच्या स्फूर्तिगीतांनी तत्कालिन लोकांना जागृत केले.

**शाहिरांची स्वातंत्र्योत्सुक स्फूर्तिगीते**

पुंडलिक फरांदे यांनी स्फूर्तिगीते लिहून जनमानसातील चेतना जागृत केली आहे. शाहिरांचा कालखंड (जन्म १९२३ व मृत्यू १९९६) स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर असा असल्याने तत्कालीन काळासाठी आवश्यक असणारी स्फूर्तिगीते त्यांच्याकडून लिहिली गेली असावीत. पारतंत्र्यात असणाऱ्या भारतमातेला स्वतंत्र करण्यात क्रांतिकारक स्वातंत्र्य सैनिकांचा जसा वाटा आहे. तसाच कवी, शाहीर, लेखक यांचाही मोलाचा वाटा आहे. साने गुरूजी, कवी वसंत बापट, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर यांनी स्फूर्तिगीते लिहून भारतीयांचे देशप्रेम जागृत केले आहे. मराठी साहित्यातील कादंबरीकार, नाटककार, कथाकार यांनीही आपल्या वाययातून लोकांना देशप्रेमाचे धडे दिले आहेत. यात शाहिरही मागे नाहीत. शाहिरांचे पोवाडे म्हणजे तर स्फूर्तीचा धबधबाच म्हणावा लागेल.

**पिटाळू दर्याच्या पार**

लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात आपले काव्यलेखन केले आहे. भारतदेश पारतंत्र्यात असताना शाहिरांसारख्या तळमळीच्या कार्यकर्त्याला त्यांची मन - बुध्दी व लेखणी स्वस्थ कशी बसू देईल. इंग्रज सरकारने भारतीयांवर केलेले अत्याचार शाहिरांना अस्वस्थ करतात व त्यातूनच 'पिटाळू दर्याच्या पार!' या स्फूर्तिगानाचा जन्म झाला. शाहीर म्हणतात,

''गोरी माकडं नाचत्याती हिकडं, धुडगुस घातलाया की रं
मर्दानी फाकडं याकी रं हिकडं, पिटाळू दर्याच्या पार
आमच्या देशात, घुसलया गोरं।
मगरूर आहे, व्यापारी चोर।।
हैराण केलया, पडलाया घोर।
सर्वांनी उठून, रेटायचा खच्चून, घालवायचा सीमेपार।। १ ।।
माल त्याचं हाल, चोरटं खुशाल।
फुगल्यात याचं, गुलाबी गाल।।
गलेलट्ठ झालाया, अति न्हालं।
अति तिथं माती, झालीया गती, लुटतुया देश हा फारं।। २ ।।''५

गीताच्या प्रारंभीच शाहिरांनी इंग्रजांना 'गोरी माकडं' असे संबोधले आहे. यातून त्यांच्या ठायी असणाऱ्या देशप्रेमाची प्रचिती येते. या माकडांनी सर्वत्र धुडगूस घातला असल्याने त्यांना पिटाळून लावले नाही तर आपल्या देशाचे ते नुकसान करतील असे शाहिरांना वाटते. व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते झालेल्या इंग्रजांची मगरूरी वाढल्याचे शाहिरांच्या लक्षात आलेले असल्याने ते सर्वांना बळ लावून गोऱ्या इंग्रजांना मागे रेटण्याचा आग्रह धरतात. कारण या चोरट्यांनी आपल्या देशाच्या संपत्तीवर डल्ला मारून

 ISSN No. 2319-6025

Scanned with CamScanner

स्वतः गलेलट्ठ झाले आहेत. परंतु त्यांची ही अनागोंदी वाढल्याने त्यांना थोपविणे गरजेचे आहे. असा इशाराही त्यांनी दुसऱ्या कडव्यात दिला आहे.

समुद्रमार्गाने आपल्या देशात प्रवेश केलेल्या इंग्रजांना 'पिटाळू दर्याच्या पार।' असे म्हणून शाहिरांनी 'जशास तसे' अशी भूमिका स्वीकारली आहे. इ. स. १९४२ साली म. गांधींनी दिलेली 'चले जाव' ची गर्जना व शाहिरांची प्रस्तुत रचना यामध्ये खूपच साम्य असल्याचे दिसून येते. हया गोऱ्या माकडांना दर्यापार पाठविण्यासाठी मर्दानी फाकड्यांची गरज भासते त्यामुळे त्यांनी अशा फाकड्यांना आवाहन केले आहे. शाहिरांनी वापरलेले माकडं, फाकडं, हिकडं हे ग्रामीण शब्द गीताला बहार आणतात, श्रोत्यांची स्फूर्ती वाढवितात. तसेच 'माल त्याचं हाल, चोरटं खुशाल' व 'अति तिथं माती' अशा ग्रामीण म्हणींचा समर्पक वापर करून गीताची रंगत वाढविली आहे. तसेच शाहिरांनी पहिल्या कडव्याच्या शेवटी व चौथ्या कडव्याच्या शेवटी वापरलेले चरण क्रमशः 'सर्वांनी उठून, रेटायचा खच्चून, घालवायचा सीमेपार', 'उठून आता घालूया लाथा, ठेवायचा नाही हा कार' श्रोत्यांच्या ही मनात आत्मविश्वास निर्माण करतात. शाहीर पुंडलिक फरांदे यांचा प्रस्तुत गीतातील जोश व आवेश पाहिल्यानंतर शा. अमर शेख व शा. अण्णाभाऊ साठे यांच्या काव्याची आठवण होते. हे या गीताचे यश आहे. शिवाय शाहिरांनी काव्यलेखनासाठी वापरलेली ग्रामीण भाषा, साधे व सोपे शब्द, इंग्रजांना वापरलेली गोरी माकडं ही उपमा, इंग्रजांच्या काळया कारभाराची प्रजेला करून दिलेली आठवण या सर्व वैशिष्ट्यांमुळे रसिक श्रोत्यांच्या मनात देशप्रेम जागृत होते. ही त्यांच्या गीताची फलश्रुती आहे.

**समारोप**

शाहीर म्हंटले की पोवाडा आणि लावणी आठवते. त्यातही पोवाडा म्हंटले की वीर रस व लावणी म्हंटले की शृंगाररस आठवतो. पण याहीपलिकडे जाऊन शाहिरांचे योगदान आहे हे लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांच्या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाने सिद्ध होते. त्यांची स्फूर्तिगीते स्वातंत्र्यसैनिकांचे मन, मेंदू व मनगट बळकट करीत होते. त्यांचे हे कार्य दुर्लक्षित करुन चालणार नाही. इतिहासाच्या पानावरील अशा दुर्लक्षित हिरोंचाही इतिहास जगासमोर यायला हवा. अशा ज्ञात अज्ञात दुर्लक्षित हिरोंना अभिवादन करुन थांबतो. धन्यवाद!

**संदर्भ टीपा**

१) लोकशाहीर पुंडलिक फरांदे कृतः 'लोकगीते', प्रकाशक सत्यशोधक विद्यार्थी संघ, सातारा, प्रथमावृत्ती १९९५, पृ. क्र. ६१.
२) गुजर जयवंत (संपा.) : स्मरणिका, 'महाराष्ट्रभूषण लोकशाहीर पुंडलिक फरांदे', मुद्रक - विजय प्रिंटींग प्रेस, सातारा, २६ ऑक्टो. १९९२ पृ. क्र. ९.
३) गुजर जयवंत (संपा.) : स्मरणिका, 'लोकशाहीर फरांदे गुणगौरव समारंभ' दि. २८ सप्टें. १९६९ पृ. क्र. १.
४) तत्रैव : पृ. क्र. ५७.
५) लोकशाहीर पुंडलिक फरांदे कृतः 'लोकगीते', उनि. पृ. क्र. ४५.



Scanned with CamScanner